# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbce@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1805
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 20 AUG 2022

## परिपत्रक क्रमांक 66

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठास प्रश्नपत्रिका व उत्तरसूची त्रुटी बाबत निवेदने प्राप्त होत आहेत. त्यापैंकी ब-याच निवेदनाची पुनरावृत्ती सातत्याने होत असल्याचे विद्यापीठ प्रशासनास दिसून येत आहे. विद्यापीठास विहित मुदतीत प्राप्त त्रुटींचे निरसन होऊन निकाल देखील जाहीर झाले आहेत. तरी देखील निकाल प्रसिध्द झाल्यानंतर ही दररोज विलंबाने काही निवेदने प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त होत आहेत.

वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेले त्रुटींची निवेदने संबंधित विषयाची परीक्षा झाल्यानंतर ५ दिवसाच्या आत परीक्षार्थी ज्या महाविद्यालयात शिकत आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत लेखी कळविणे आवश्यक आहे. परीक्षार्थी ज्या महाविद्यालयात शिकत आहे त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत, विषयतज्ञांच्या मतासह निवेदन प्रस्तुत विद्यापीठास त्रुटीची खात्री करण्यासाठी प्रश्नपत्रिका, उत्तरसूची व त्यासंदर्भात आवश्यक त्या कागदपत्रासह पाठवून देण्याबाबत संबंधितांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

सबब, येथून पुढे वर नमूद केल्याप्रमाणे निवेदने विद्यापीठास प्राप्त झाल्या नंतरच त्या निवेदनावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची संबंधितानी नोंद घ्यावी. सदरची परिपत्रक महाविद्यालयांनी संबंधितांच्या निर्दशनास आणून देऊन प्रस्तुत विद्यापीठास सहकार्य करावे. ही विनंती.

( डॉ. शिवकुमार एस. गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/ विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

२) परीक्षार्थी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यास योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित